# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/06/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## करंट लागून जनावराचा मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत मौजा वडोदा ता. मौदा येथे दिनांक ०८/०६/२०२३ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रभाकर उमाटे, वय ५५ वर्ष, रा. वडोदा ता. मौदा व यातील आरोपी नामे— शेखर चौधरी, रा. वडोदा ता. मौदा यांचे शेत एकमेकांच्या शेजारी असून शेतामध्ये जंगली जनावरे येवू नये म्हणून यातील आरोपी याने शेताला कंपाउंड केले आहे व त्याला करंट लावलेला आहे. यातील फिर्यादीच्या शेतात रखवाली करीता असणारा कुत्रा हा यातील आरोपी याने शेताला लावलेल्या कंपाउंड ताराच्या करंटमुळे मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२८ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांदेवार मो. नं. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**